# श्रीराम कला महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे

**विषय :- गृहअर्थशास्त्र**

**अभ्यासमंडळाअंतर्गत घेण्यात आलेले विविध उपक्रम**

**सत्र (२०२४-२५)**

**अभ्यासमंडळाचे सर्व उद्दीष्ट्ये साध्य व्हावे म्हणून सत्र २०२४-२५ या शैक्षणिक सत्रात पुढील कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.**

* गृहअर्थशास्त्र अभ्यासमंडळाचे उद्‌घाटन आणि पोषण सप्ताह अंतर्गत डिश डेकोरेशन (दि. १३ सप्टेंबर २०२४)

* पोषण सप्ताह निमित्य पोषण सुंदरी स्पर्धा व मोदक स्पर्धा (दि. १४ सप्टेंबर २०२४)

* B.A. I Sem II च्या विद्यार्थिनींची प्रात्याक्षीका अंतर्गत भेट. (दि. १ एप्रिल २०२५)

* B.A. III, Sem VI गेस्ट लेक्चर (५ एप्रिल २०२५)

* ब्लॉक प्रिंटींग ठसा छपाई च्या प्रात्यक्षिकाचे आयोजन (८ एप्रिल व १६ एप्रिल २०२५)

**अभ्यास मंडळाची कार्यकारिणी**

**उद्घाटन समारंभ २०२४-२५**

**दिनांक - १३ सप्टेंबर २०२४**

**अभ्यास मंडळातील सदस्य**

| | | |
|---|---|---|
| • कु. अस्मीता तेलंगे | बी.ए.भाग -३ | अध्यक्ष |
| • कु. वैष्णवी मोहोड | बी.ए.भाग-३ | उपाध्यक्ष |
| • कु. अंकिता भाकरे | बी.ए.भाग-३ | सचिव |
| • कु. वैष्णवी नखाते | बी.ए.भाग-२ | सदस्य |
| • कु . समीक्षा भगत | बी.ए.भाग-२ | सदस्य |
| • कु. वैष्णवी फेंडर | बी.ए.भाग-२ | सदस्य |
| • कु. पुनम मने | बी.ए.भाग-१ | सदस्य |
| • कु. पुनम घोडखांदे | बी.ए.भाग-१ | सदस्य |
| • कु. भारती देवके | बी.ए.भाग-१ | सदस्य |

## १. गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन आणि डिश डेकोरेशन स्पर्धा (१३ सप्टेंबर २०२४)

गृहअर्थशास्त्र विभागमध्ये पोषण महिना साजरा करण्यात आला . १ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यामध्ये सर्व प्रथम १३ सप्टेंबरला गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राऊत सर यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक कर्यक्रमाला उपस्थीत होते.

त्यानंतर डिश डेकोरेशन स्पर्धा ठेवण्यात आली होती यामध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थिनींनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परिक्षण महाविद्यालयाच्या ग्रंथपाल डॉ. नीता केने यांनी केले यावेळी स्पर्धेमध्ये परिक्षकांनी निवडलेल्या विद्यार्थिनींना विभागातर्फे बक्षिस सुध्दा देण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थिनींनी उकृष्ट प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. योगिता तीवाडे हिने केले. तर कार्यक्रमाचे  आभार प्रदर्शन कु. अस्मिता तेलंगे हीने केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उयपस्थीत होते. तसेच बहुसंख्य विद्यार्थिनींची उपस्थीती होती.












**२. पोषण सत्पाह निमीत्य "पोषण सुंदरी स्पर्धा " व "मोदक स्पर्धा" (१४ सप्टेंबर २०२४)**

जागतीक पोषण महिना निमीत्य महाविद्यालयामध्ये १४ सप्टेंबर २०२४ ला पोषण सुंदरी स्पर्धा व मोदक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही स्पर्धेमध्ये विद्यार्थीनींनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोदवीला होता या स्पर्धेचे आयोजन गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. मोनाली इंगळे यांनी केले. स्पर्धेमध्ये परीक्षकांनी निवडलेल्या विद्यार्थीनींना विभागतर्फे बक्षीस देण्यात आले होते स्पर्धेचे परीक्षण महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. नीता केने आणि शारिरीक शिक्षण संचालक डॉ. पाथरे सर यांनी केले महाविद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थिनी या कार्यक्रमाला उपस्थीत होत्या.











### ३. अंतर्गत सजावट असलेल्या घराला शैक्षणीक भेट (१ एप्रिल २०२५)

दि. १ एप्रिल २०२५ ला बी. ए. भाग I सेमीस्टर II च्या गृहअर्थशास्त्र विभागाच्या मुलींची शैक्षणीक भेट धामणांव रेल्वे येथील रहिवासी श्री. शंकरराव गंगासागर (कृष्णविहार) यांच्या घराला भेट देण्यात आली. त्यांच्या मुलांनी त्यांना घर बांधुन दिले होते. घरात सर्व सोयी सुविधा होत्या. घर साधे पण छान डेकोरेट केले होते. वेगवेगळ्या प्रकारची ऊपकरणे त्यांचा ऊपयोग कसा करायचा याची माहिती त्यांनी विद्यार्थिनींना चांगल्या प्रकारे दिली.

एकंदरीत या शैक्षणीक व्हिजीटचा फायदा फायदा मुर्लीना झाला. प्रत्येक मुलीला साधनांबद्दल माहिती असणे गरजेचे आहे. प्रत्येक वस्तु ही अनोळखी वाटु नये आणि तयांचा वापर कसा करायचा याचे ज्ञान आजच्या विद्यार्थिनीला असायला हवे म्हणुन ही शैक्षणिक भेट ही विद्यार्थिनीला असायला हवे म्हणुन ही शैक्षणिक भेट ही विद्यार्थीनींसाठी एक चांगला आणि सुखद अनुभव होता.












### ४) वीर नारायण दूध डेअरी धामणगाव रेल्वे येथे शैक्षणिक भेट (५ एप्रिल २०२५)

स्थनीक गांधी चौक येथील वीर नारायण दूध डेअरीला बी.ए. भाग (२) सेमीस्टर IV च्या विद्यार्थीनींनी भेट दीली. डेअरीचे मालक वीर नारायणजी यांनी तेथील दूधाच्या पदार्थांचे संरक्षण कसे करायचे किंवा करतात हे विद्यार्थीनींना समजुन सांगीतले. कोणता पदार्थ कसा संरंक्षीत केला जातो याचे मार्गदर्शन केले. तसेच घरच्या घरी दूधापासून जे पदार्थ जसे दही, खवा, पनीर, श्रीखंड हे पदार्थ कसे तयार करायचे याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांचबरोबर आमच्या सर्व विद्यार्थीनींना जातांना शेवटी आईस्क्रीम सुध्दा खायला दीले.












**५) प्रात्याक्षिकाअंतर्गत गेस्ट लेक्चर (जंक फुड) ५ एप्रिल २०२५**

बी. ए. भाग III सेमीस्टर IV च्या विद्यार्थीनींना प्रात्यक्षिकाअंतर्गत जंकफुड शरीरासाठी घातक या विषयावर उद्‌बोधन करण्यात आले. बाहेरचे पदार्थ हे शरीरासाठी कीती घातक आहे याबद्दल डॉ. मोनाली इंगळे यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. तसेच मैद्याचे पदार्थ सुध्दा कीती हाणीकारक आहे हे सुध्दा सांगीतले तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. नीता केने यांनी सुध्दा विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले. आणि बाहेरचे पदार्थ खाण्यापेक्षा सर्व पदार्थ घरी बनवुन खावे असे सांगीतले. विद्यार्थीनींना सुध्दा या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद दिला.












**६. ब्लॉक प्रिंटींग ठसा छपाईच्या प्रात्यक्षीकाचे आयोजन ( ८ एप्रिल व १६ एप्रिल २०२५)**

बी.ए. भाग I च्या विद्यार्थीनींसाठी गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे प्रात्यक्षिकाअंतर्गत विद्यार्थिनींना ठसा छपाई हे कापडावर कसे करायचे त्याचे प्रशिक्षण दिले. साडी, ड्रेस, पीलो, चादर, टेबलक्लॉथ यावर ठसा छपाई कशी करायची हे शिकवीण्यात आले. गृहअर्थशास्त्र विषय असलेल्या माजी विद्यार्थीनींनी महाविद्यालयात येवुन विद्यार्थिनींना ठसा छापाई कशी करायची याचे मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धेच्या युगात नौकरीची शक्यता फार कमी असल्यामुळे विद्यार्थीनींना स्वत:च्या पायावर उभे राहुन आत्मनीर्भर बनण्यासाठी हा विषय कीती आवश्यक आहे आणि याचा फायदा आपण स्वयंरोजगारासाठी करू शकतो. हेही त्यांच्या लक्षात आणुन दीले.

गृहअर्थशास्त्र विभाग विद्यार्थीनींच्या विकासाठी नेहमीच तत्पर असतो. आणि महाविद्यालयातील विद्यार्थीनींना आत्मनीर्भर बनवून अर्थार्जन करण्यासाठी हा विभाग नेहमीच सहकार्य करित असतो.










